# अनेकान्त टाईम्स

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

DMCS BARAMATI

www.tccollege.org

शनिवार, २६ ऑक्टोबर २०२४ | पाने ४ | अंक १ ला

शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ | तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या मीडिया अ‍ॅन्ड कम्युनिकेशन विभागाचे प्रायोगिक प्रकाशन | खाजगी वितरणासाठी


सोने ₹ ७०९५०/-

चांदी ₹ १,०३,०००/-

हवामान : २९°, कमाल : २१° किमान


2 लोकशाही आणि निवडणूका...

3 राष्ट्रीय कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्र चौथ्या स्थानी

4 टी. सी. महाविद्यालयामध्ये 'म्युझिकलिट'


## अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या 'कॉलेज ऑफ फार्मसीला' मान्यता

**बारामती :** अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ फार्मसीने डिप्लोमा इन फार्मसी (डी. फार्म) व बॅचलर इन फार्मसी (बी. फार्म) या अभ्यासक्रमांसाठी मान्यता मिळाली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर यांनी दिली.




आदित्य गायकवाड

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, दिल्लीच्या तज्ज्ञ पथकाने महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधांची व अभ्यासक्रमाची तपासणी केल्यानंतर हा कोर्स सुरू करण्यासाठी मान्यता दिली. यामुळे फार्मसी क्षेत्रात विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळून व्यावसायिक क्षेत्रात प्रवेश घेण्यासाठी तयार होतील. यामध्ये उच्च दर्जाचे शिक्षण, अत्याधुनिक सुविधा, १३ प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम्स, प्लेसमेंट सेल, ग्रंथालय व वसतीगृह या सर्व सुविधा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहेत.

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी मागील ६२ वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडले आहेत. या नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना उत्तम संधी उपलब्ध होणार आहेत.

या अभ्यासक्रमाला मान्यता मिळविण्यासाठी अध्यक्ष जवाहरशाह वाघोलीकर, सचिव मिलिंदशाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

'झापुक-झुपूक'



बिग बॉसची ट्रॉफीसुद्धा 'झापुक-झुपूक' स्टाईलने बारामतीतच आली की...

## 'जल्लोष २०२४' स्पर्धेत टी.सी. महाविद्यालय जल्लोषात प्रथम

**बारामती :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर, बारामती यांच्यावतीने आयोजित 'जल्लोष २०२४' जिल्हास्तरीय आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय 'जल्लोष २०२४ चषकाचे मानकरी ठरले. टी.सी. महाविद्यालयाने २७ कलाप्रकारांपैकी १८ कला प्रकारात घवघवीत यश मिळवले.



'जल्लोष २०२४' स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील २३ महाविद्यालयातील ५८८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून मागील दोन महिन्यांपासून विद्यार्थी स्पर्धेसाठी सराव करत होते. प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख भीमराव तोरणे, राजेंद्र कंडरे, सोमनाथ कदम, जय दोशी, विशाल मोरे व विद्यापीठ प्रतिनिधी सौरभ पांढरे यांनी या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले.

अजय रणदिवे

'जल्लोष २०२४ चषक' स्पर्धेचे पारितोषिक वितरण व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. देविदास वायदंडे, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ. अभिजित कुलकर्णी, प्राचार्य डॉ. श्रीकुमार महामुनी, पुणे विद्यापीठाचे स्पर्धा समन्वयक स्वामीराज भिसे यांच्या उपस्थितीत पार पडले.

प्रहसन, एकांकिका, भारतीय समूह नृत्य, भारतीय समूह गायन, मूकनाट्य, पाश्चिमात्य समूह गायन, लोक वाद्यवृंद समूह, प्रश्नमंजूषा, इन्स्टॉलेशन, वादविवाद, चिकटकला, मेहंदी, पोस्टर मेकिंग, पाश्चिमात्य वाद्य वादन, स्वर वाद्य, सुगम संगीत, फोटोग्राफी या कला प्रकारातील विजयी विद्यार्थ्यांना सुवर्णपदक, रौप्यपदक, कांस्य पदक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहरशाह वाघोलीकर, संस्थेचे सचिव मिलिंदशाह वाघोलीकर आणि प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

## ''भाषण करताना आपले मत ठामपणे मांडता आले पाहिजे'' : शशांक मोहिते

**बारामती :** व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्याचा आवाज, ठाम वक्तव्य या वरून होत असते. आजच्या युगात टिकुन रहायचे असेल तर आपले विचार ठामपणे मांडण्याचे कौशल्य विद्यार्थांमध्ये असले पाहिजे. 'न बोलत सोने जरी विकायला बसलो तरी विकणार नाही, पण बोलता बोलता चिंध्या पण विकल्या जातील' अशी काहीशी आजची परिस्थिती आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध निवेदक शशांक मोहिते यांनी केले.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात मराठी विभाग व उद्योजकता विकास केंद्राअंतर्गत भाषण लेखन : तंत्र व कला याविषयी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध निवेदक शशांक मोहिते हे उपस्थित होते. मराठी भाषा व कौशल्ये याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले की, 'भाषण करण्यासाठी व आपला मुद्दा ठामपणे मांडण्यासाठी विषय, आवाज व देहबोली या तीन गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत'. त्याचबरोबर प्रमाण भाषेचा वापर करावा पण त्याचा अट्टाहास नसावा असा सल्लादेखील त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच 'भाषण करताना आपले मत मांडण्याबरोबरच ते समोरच्या व्यक्तीला पटवून देणे सुद्धा तितकेच गरजेचे आहे'. माणसाला बोलण्याची गरज आहे का? जर ती आहे तर कधी, कुठे व कशाप्रकारे या मुद्द्यांद्वारे दैनंदिन जीवनातील उदाहरणाद्वारे त्यांनी विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. विद्यार्थांनीदेखील या कार्यशाळेस उस्फूर्तपणे प्रतिसाद दिला. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, मराठी विभागप्रमुख सीमा नाईक गोसावी, डॉ. विकास काकडे, डॉ. मुक्ता अंभेरे आदी उपस्थित होते.



वैष्णवी थोरात







# मराठी खलनायिकेचा... सत्तरीचा कलाप्रवास

'प्रत्येक कलाकाराचा अभिनय क्षेत्रातील सुरुवातीचा काळ हा अतिशय खडतर असतो. यश, अपयशाच्या या प्रवासात जो संयम बाळगतो तो नक्कीच यशाच्या शिखरावर पोहोचतो. अभिनय क्षेत्रात टिकून राहण्यासाठी वेळोवेळी स्वत:ला सिद्ध करावं लागतं. अशातच एका मुलीने वयाच्या १२ व्या वर्षी अभिनयाचं स्वप्न डोळ्यात ठेवून अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवलं. ती मुलगी म्हणजेच सात दशकाहून अधिक काळ अभिनय क्षेत्रात काम करणारी ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे. त्यांचा जन्म ९ डिसेंबर १९४२ रोजी पुणे येथे झाला.



सायली गणेशकर

सुहासिनी देशपांडे हे मराठी चित्रपटसृष्टीतील एक मोठं नाव होतं. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक प्रसिद्ध चित्रपटात काम केले आहे. मागील ७० वर्षात शंभरहून अधिक चित्रपटामधील आपल्या अभिनयातून त्यांनी चाहत्यांच्या मनात ठसा उमटवला आहे. अनेक चित्रपटात त्यांनी यशस्वी खलनायिकेची भूमिका साकारली, या भूमिकेमुळे त्यांची लोकप्रिय खलनायिका म्हणून ओळख निर्माण झाली.

### ज्युनिअर आर्टिस्ट म्हणून काम...

सुरुवातीच्या काळात पुण्यातील आसपासच्या परिसरात मनोरंजनाचे मेळे आयोजित केले जात. त्यामध्ये सुहासिनी देशपांडे सहभागी होत. 'बहुरूपी व्यवस्था कला झंकार नृत्य' पार्टीच्या मेळाव्यातून त्यांनी नृत्यांगना म्हणून कलेची सुरुवात केली, तसेच लीला गांधी यांच्यासोबत त्यांनी नृत्याचे असंख्य कार्यक्रम केले. यामधूनच त्यांची ओळख निर्माण होत गेली. पुढे त्यांनी 'सोळावं वरीस धोक्याचं', 'एक तमाशा सुंदर' अशी काही वगनाट्य केली. पुण्यातील 'डेक्कन प्रभात नवयुग' स्टुडिओ मधून त्यांनी नृत्य कलाकार तसेच ज्युनिअर आर्टिस्ट म्हणून कामास सुरूवात केली.

### लोकप्रिय नाटके...

'बेबंदशाही' या नाटकातून त्यांनी रंगमंचावर पहिले पाऊल ठेवले. 'तुझं आहे तुजपाशी', रखेली, 'कथा अकलेच्या कांद्याची', 'राजकारण गेलं चुलीत', 'चिरंजीव आईस', 'सासुबाईंचं असंच असतं', त्यांची ही काही लोकप्रिय नाटके.

### खलनायिका म्हणून ओळख निर्माण करणारे चित्रपट...

नाट्य क्षेत्रच नव्हे, तर रुपेरी पडदा देखील त्यांनी गाजवला. 'देवकीनंदन गोपाला', 'वारसा लक्ष्मीचा', 'काळुबाईच्या नावानं चांगभलं', 'पुढचं पाऊल', 'माहेरची साडी' अशा शंभरहून अधिक चित्रपटांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा चाहत्यांच्या मनात उमटवला. केवळ मराठीच नव्हे, तर 'वक्त से पहले', 'सिंघम' यांसारख्या प्रसिद्ध हिंदी चित्रपटांमध्ये देखील त्यांनी यशस्वी काम केले.

### प्राप्त पुरस्कार...

सुहासिनी देशपांडे यांना त्यांच्या यशस्वी अभिनयाची पोच पावती म्हणून अनेक पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. त्यामधील काही निवडक 'अखिल भारतीय मराठी नाट्य' परिषदेच्या पुणे शाखेतर्फे जयंतराव टिळक स्मृति जीवनगौरव पुरस्कार (२०१५), तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी २०२२ जीवनगौरव पुरस्कार.

अशा या ज्येष्ठ अभिनेत्रीने २७ ऑगस्ट रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी पुणे येथील खाजगी रुग्णालयात कर्करोगाशी झुंज देत त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

# लोकशाही आणि निवडणूका...

जगातील सर्वात मोठा लोकशाही असलेला देश म्हणून भारताची ओळख आहे. या लोकशाहीची जपणूक ही निवडणुकांच्या माध्यमातून केली जाते. लोकशाही म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व नि:पक्षपाती निवडणुकांद्वारे जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींद्वारे चालणारे राज्य होय, तर सामान्य व्यक्तीने केलेली लोकशाहीची सरळ सरळ व्याख्या म्हणजे लोकांनी लोकांच्या हितासाठी, लोकांद्वारे चालविलेले राज्य होय. लोकशाही सरकार हे एक उत्तम उत्तरदायी सरकार आहे. लोक प्रतिनिधींद्वारे जनता प्रत्यक्ष नव्हे तर अप्रत्यक्षरित्या शासन निर्णयांमध्ये सहभागी होत असते. त्यामुळे लोकशाही निर्णयक्षमतेची गुणवत्ता सुधारते. यामुळे एकतर राज्यकर्त्यांना त्यांचे निर्णय बदलावे लागतील किंवा राज्यकर्ते बदलता येतील. म्हणूनच आजही लोकशाही हा शासन निवडीचा उत्तम प्रकार मानला जातो.



वैष्णवी थोरात

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी देशाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यावर सोपविण्यात आली. स्वातंत्र्य जरी १९४७ मध्ये मिळाले असेल, तरी पहिली निवडणूक १९५१-५२ या दोन वर्षात पार पडली होती. लोकशाही पद्धतीने नव्याने जन्म घेऊ पाहणारा भारत देश प्रथमच या प्रक्रियेला सामोरे जाणार होता, म्हणूनच ही निवडणूक जास्त काळ चालली. लोकांच्या दृष्टीतूनच देशाची सत्ता उभी राहिली पाहिजे, याच हेतूने ही सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली होती. तेव्हा लोकसभेसाठी ४८९ तर विधानसभेसाठी ३,२८३ जागा होत्या. त्यावेळी ८२% लोक निरक्षर होते. प्रौढ नागरिकांना मतदान करण्याचा अधिकार देणारे फार कमी देश त्या काळी होते आणि भारत त्यातीलच एक देश होता. यामुळे २५ जानेवारी १९५० रोजी स्थापन झालेल्या निवडणूक आयोगासमोर फार मोठी आव्हाने उभी राहिली होती. सुकुमार सेन यांनी पहिले मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून काम पाहिले.

१९ एप्रिल १९५० रोजी नेहरू यांनी संसदेत लोकप्रतिनिधीत्वचा कायदा मांडून जाहीर केले, की पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५१च्या वसंत ऋतू मध्ये होईल. मात्र, त्यापूर्वी अशा प्रकारची व एवढ्या मोठ्या पातळीवर निवडणूक प्रक्रिया राबविण्याचा अनुभव कोणालाही नव्हता. त्यापूर्वी १९३७ मध्ये जी निवडणूक झाली होती, ती भारतातील तत्कालीन ९ विभागांमध्ये झाली होती. त्यामध्ये आसाम, बिहार, बॉम्बे, मध्य प्रदेश, मद्रास, ओरिसा, पंजाब, पश्चिम बंगाल आणि संयुक्त प्रांत असे ९ विभाग तुलनेने लहान होते, परंतु आता होणाऱ्या निवडणुकीत त्यांच्या समोर प्रचंड मोठी आव्हाने होती.

त्यामधील एक गमतीशीर आव्हान रामचंद्र गुहा सांगतात की, ''उत्तर प्रदेशमधील अनेक महिला या आपले नाव सांगायच्या नाहीत. त्या मतदार नोंदणी करताना 'अ'ची आई आणि 'ब'ची बायको अशा प्रकारे नाव सांगायच्या.'' ही गोष्ट जेव्हा मुख्य निवडणूक आयुक्तांना समजली, तेव्हा ते संतापले आणि त्यांनी आपल्या सर्व अधिकाऱ्यांना त्या महिलांची खरी नावे नोंदवून घेण्यास सांगितले. शेवटी जम्मू-काश्मीर वगळता संपूर्ण देशातील १७.३२ कोटी मतदारांची नोंदणी करण्यात आली. त्यातील ४५% महिला होत्या.

स्वतंत्र भारतानंतर होणाऱ्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १९ लाख स्टीलच्या मतपेट्या तयार करण्यासाठी १२हून अधिक कारखानदारांना कंत्राट देण्यात आले होते. यातील प्रत्येक मतपेटीची किंमत ४ ते ६ रुपये ठरवण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीसाठीच्या मतपेट्या हिरव्या रंगाच्या ४ छटांमधे होत्या, तर विधानसभेसाठी ज्या मतपेट्या होत्या, त्या तपकिरी रंगाच्या ४ छटांमध्ये होत्या. काही रंगीबेरंगी मतपेट्यांचा वापरही करण्यात आला होता. निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी १.३२ लाख मतदान केंद्रे आणि १.९६ लाख बूथ उभे करण्यात आले होते. तसेच निवडणुकीसाठी ३.३८ लाख पोलिस कर्मचारीही तैनात करण्यात आले होते.

१९५१ मध्ये चालू झालेला हा निवडणुकीचा प्रवास आजही सुरु आहे. १९५१ साली सुरू झालेला ७३ वर्षांचा 'लोकशाही'चा हा प्रवास नक्की लोकांसाठीच चालू आहे का? लोकांनी लोकांसाठी हक्काची व्यक्ती निवडणे म्हणजे लोकशाही पण आजच्या काळात सगळ्यांनीच लोकशाहीचा बाजार मांडलाय. जनतेने निवडलेला नेता हा त्यांचा मालक नसून त्यांच्या हितासाठी काम करणारा सेवक असतो, हे आज कुठे तरी नेता विसरून चालला आहे. निवडणुकांमध्ये पूर्वीसारखी पारदर्शकता व विश्वास आज लोकांमध्ये दिसून येत नाही. ई.व्ही.एम मशीनमध्ये होणारे घोटाळे, स्वार्थासाठी पक्ष प्रवेश, अशा अनेक घटना आपण नेहमी पाहतो. पण या संपूर्ण घटनेला आज कुठे न कुठे आपणच जबाबदार आहोत. एक नागरिक म्हणून पात्र उमेदवारास मतदान करून ही आजची ढासळलेली लोकशाही पुन्हा एकदा नव्याने उभा करूया. 'श्रेष्ठदान मतदान' म्हणून चला पुन्हा एकदा आपण आपला हक्क बजाऊया आणि आपल्या देशासाठी, आपल्या प्रगतीसाठी योग्य उमेदवार निवडूया.

# महिला सुरक्षा?

सामाजिक विषमता ही धर्म, जात आणि लिंग या तीन घटकांवर आधारित आहे. परंतु पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान दिले आहे. धर्माच्या नावाखाली सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यांसारख्या अनेक अन्यायकारक प्रथांनी लाखो स्त्रियांचे आयुष्य उध्वस्त केले. या जाचक प्रथांच्या पेचातून स्त्रियांना जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय या समाजसुधारकांनी बाहेर काढले. त्यांना शिक्षित करून त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली.



सायली गणेशकर

आजची परिस्थिती पाहता स्त्री ही केवळ एक उपभोगाची वस्तू आहे, ही लोकांची मानसिकता बदलणे काळाची गरज आहे. असे असले तरी वास्तव जगात मात्र स्त्रियांना समाजात विशेष स्थान असून देखील आजही समाजात हुंडाबळी, नववधूंना जाळणे, स्त्री गभार्ची हत्या, महिलांवरील लैंगिक अत्याचार, बलात्कार या स्वरूपाचे गुन्हे घडताना दिसतात.

आपण व्यासपीठांवरून भाषणे देतो. राज्यघटनेने स्त्री-पुरूष समानतेचा हक्क दिला आहे. पण खरोखर आपल्या देशात स्त्रियांना समानतेचा हक्क आहे का? खऱ्या अर्थाने त्यांना तो हक्क उपभोगायला मिळता का? समाजात त्यांना समानतेची वागणूक मिळते का? कारण सध्याच्या परिस्थितीत घडणाऱ्या घटना पाहता या सर्व प्रश्नांची उत्तरे मात्र अनुत्तरीतच आहेत. आज स्त्री समाज, घर, कामाचे ठिकाण, शाळा अशा कोणत्याच ठिकाणी सुरक्षित नाहीत. एकीकडे 'बेटी बचाव बेटी पढाओ' ही मोहिम चालवली जाते, तर दुसरीकडे तिच्यावर होणाऱ्या अन्यायाला बऱ्याच वेळा दुर्लक्षित केले जाते.

गेल्या काही दिवसांपूर्वी घडलेल्या कोलकाता, बदलापूर सारख्या असंख्य अत्याचाराच्या घटनांनी हादरवून टाकले आहे. ही परिस्थिती बदलणे काळाची गरज आहे. महिलांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहेत, ही परिस्थिती बदलण्यासाठी कठोर कायद्यांची निर्मिती आणि अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. असे झाले तरच पुन्हा दुसऱ्या कोणाचे असे कृत्य करण्याचे धाडस होणार नाही. तसेच महिला अत्याचार कमी करण्यासाठी समाजातील अनेक घटकांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. प्रत्येक वेळी 'स्त्री'ने कसे वागावे हे सांगण्यापेक्षा कधीतरी पुरूषांनी कसे वागावे? त्यांची मानसिकता बदलावी याविषयी सांगावे, तरच ही परिस्थिती बदलू शकते.

Slim Fit Diet Care Center Baramati
India`s Best Weight Loss Plan
आहारतज्ञ

| | |
|---|---|
| वजन कमी करणे (लठ्ठपणा) | Weight Loss (Obesity) |
| वजन वाढविणे | Weight gain |
| डायबिटीज,उच्च रक्तदाब | Sugar , BP |
| एनिमिया, प्रोटीन डायट | Anemia |
| गर्भवती स्त्रीचा आहार | Pregnancy Diet |
| गर्भधारणे नंतरचा आहार | Past Pregnancy Diet |
| पी.सी.ओ.डी./अनियमित पाळी | Irregular Periods |
| हार्मोनल असंतुलन | Harmonal Inbalance |
| स्किन प्रॉब्लेम, केसांच्या समस्या | Skin & Hair Problem |
| थॉयराईड डायट | Thyroid Diet |




Sarika S. Jagtap P.G.Dietician and Nutritionist
Mob : 7588622593 / 8329184793

# सुरूवात गणेशोत्सवाच्या परंपरेची...

श्रावण संपला की सर्वांना आतुरता असते ती बाप्पाच्या आगमनाची. पेशव्यांच्या कारकिदीर्पासून सुरू झालेला गणेशोत्सव आजही घराघरात उत्साहात साजरा केला जातो. हिंदू धर्मात कोणत्याही शुभकायार्ची सुरुवात ही गणरायाला वंदन करून केली जाते. गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी पर्यंत हा उत्सव साजरा केला जातो.



अंशुमन बोभाटे

१८८५ पासून सोलापूरात पहिल्यांदा आजोबा गणपतीचा उत्सव सुरू झाला, जो गेली १३९ वर्ष सुरू आहे. १८९३ मध्ये लोकमान्य टिळकांनी पुणे येथे विंचूरकर वाड्यात सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात केली. सुरुवात जरी पुण्यात झाली असली तरी हळूहळू तो महाराष्ट्रभर साजरा होऊ लागला. भारतीय स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाचा व्यासपीठ म्हणून वापर केला. त्यांनी 'एक गाव एक गणपती' ही प्रथा १८९३ पासून सुरू केली. या प्रथेनुसार गणेशोत्सवात विविध धर्माचे, जातीचे लोक एकत्र येऊ लागल्यामुळे जातीभेद कमी होऊ लागला. टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून लोकांना एकत्र आणून त्यांचे संघटन करून स्वातंत्र्य चळवळीबद्दल त्यांना प्रेरित केले.

पूर्वीच्या गणेशोत्सवाचे स्वरूप आणि आजच्या गणेशोत्सवाचे स्परूप यामध्ये झालेला बदल खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. पूर्वी गणेशोत्सवच्या माध्यमातून पोवाडे, यात्रा , भावगीते, नाटक, जादू इ. कार्यक्रम करणा-या कलाकारांना उत्तेजन मिळाले. नवनवे कलाकार उदयास आले. कार्यक्रम विनामूल्य असल्यामुळे सर्वसामान्य जनता उत्सवात सहभागी होत. आजच्या काळात लोकांना गणेशोत्सवामुळे अनेक व्यवसायच्या संधी उपलब्ध होत आहेत. यामध्ये फुलविक्रेता, दुकानदार, शिल्पकार, सजावट करणारे, मिठाईवाले, कलाकार, साऊंड सिस्टीम, कीर्तन, ढोलपथक, लेझीम. यामुळे लोकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत होते.

महाराष्ट्रातील हा उत्सव यशस्वीपणे पार पाडण्यामागे येथील प्रशासन, पोलीस यंत्रणा, सामाजिक संस्था बाप्पाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत कार्यरत असतात. विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम घेतले जातात. सामाजिक कार्याच्या माध्यमातून अनेक गरजूंना मदत केली जाते. जेवढा आनंद बाप्पाच्या आगमनाच्या वेळी होतो. तेवढेच दुःख बाप्पाच्या विसर्जनाच्या दिवशी होत असते. हा गणशोत्सव काही ठिकाणी दीड दिवस, तीन दिवस, पाच दिवस, सात दिवस, दहा दिवस साजरा केला जातो. गणपती विसर्जनादिवशी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या म्हणत बाप्पाला निरोप दिला जातो.

# टी. सी. महाविद्यालयाच्या एनसीसी विद्यार्थ्यांनी कंबाईन ऍन्युअल ट्रेनिंग शिबिरात बजावली मोठी कामगिरी

सौरभ तावरे

**बारामती :** टी.सी. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्स (एनसीसी) विद्यार्थ्यांनी पुणे येथे झालेल्या कंबाईन ऍन्युअल ट्रेनिंग शिबीरातील विविध स्पर्धांमध्ये ३ सुवर्णपदकांसह १ रौप्यपदक मिळवून मोठी कामगिरी बजावली.

ज्युनिअर अंडर ऑफिसर इंद्रजीत पवार याने सर्वोत्कृष्ट शिबीर सीनियर म्हणून सुवर्णपदक मिळवून बाजी मारली. कॅडेट तुषार जाधव याने नेमबाजीत प्रथम क्रमांक मिळवला, तर कॅडेट गणेश जाधवने रौप्यपदक पटकावले. कॅडेट साहिम अत्तार'ला सांस्कृतिक व्यवस्थापनातील विशेष कामगिरीविषयी सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. या शिबीरात एकूण १० मुली, १५ मुलांनी सहभाग घेतला होता. या शिबीरात झालेल्या विविध स्पर्धांमध्ये महाविद्यालयाच्या संघामध्ये उत्कृष्ट संघभावनेचे प्रदर्शन दिसून आले.




एनसीसी अधिकारी लेफ्टनंट डॉ. विवेक बळे, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले. या यशाबद्दल अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहरशाह वाघोलीकर, सचिव मिलिंदशाह वाघोलीकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# टी. सी. महाविद्यालयातील 'थ्रू द फ्रेम्स' फोटोग्राफी स्पर्धा व प्रदर्शनास प्रेक्षकांचा भव्य प्रतिसाद



राम पडळकर

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विभागांतर्गत 'थ्रू द फ्रेम्स' फोटोग्राफी स्पर्धा व प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे व्यावसायिक फोटोग्राफर ऋषिकेश क्षीरसागर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी व्यावसायिक फोटोग्राफर ऋषिकेश क्षीरसागर यांनी फोटोग्राफी विषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विभागातील विदयार्थ्यांसोबतच स्पर्धक विद्यार्थी देखील त्यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी उपस्थित होते. स्पधेसाठी पीपल, प्लेस, नेचर हे विषय देण्यात आले होते. या स्पर्धेसाठी ३००हून अधिक फोटो आले होते. याशिवाय पत्रकारिता विभागातील विद्यार्थांनी यंदाच्या वारीमध्ये काढलेल्या काही निवडक फोटोंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. संपूर्ण स्पधेर्तील वेगवेगळी छायाचित्रे प्रेक्षकांना भारावून टाकत होती. या फोटोग्राफी प्रदर्शनास बारामती तसेच आसपासच्या परिसरातून प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणात भेट दिली.

या स्पधेर्तील विजेत्यांसाठी आकर्षक बक्षीसे, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. तसेच सहभागी विदयार्थ्यांना ई-सहभाग प्रमाणपत्र दिले. या स्पर्धेचा निकाल स्पर्धेच्या परीक्षकांनी जाहीर केला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अशोक काळंगे, डॉ. वाजिद खान, विभाग प्रमुख प्रा. राहुल चौधरी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी स्पर्धा समन्वयक प्रा.गायत्री नंदकुमार, प्रा. पुजा पवार व सर्व पत्रकारितेचे विदयार्थी यांनी परिश्रम घेतले.

### स्पर्धेतील विजेते

**विद्यार्थी फोटोग्राफी गटातील विजेते –**

प्रथम– उदयन घोडके (न्यू आर्ट्स महाविद्यालय, अहमदनगर)
द्वितीय– रोहित काळे (टी. सी.महाविद्यालय, बारामती)
तृतीय– स्वप्निल गुंजारी (टी. सी.महाविद्यालय, बारामती)

**व्यावसायिक फोटोग्राफी गटातील विजेते –**

प्रथम– अनिकेत गुरव (व्यावसायिक फोटोग्राफर)
द्वितीय–प्रतिक कचरे (फ्रीलान्सर,फोटोग्राफर)
तृतीय– सौरभ माने (व्यावसायिक फोटोग्राफर)

# टी.सी. महाविद्यालयातील अविष्कार पोस्टर स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

उमेश शिंदे

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये अविष्कार पोस्टर स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ.अशोक काळंगे यांच्या हस्ते झाले.



शुद्ध विज्ञान, औषध आणि फार्मसी, कृषी आणि पशुसंवर्धन, वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, मानवता, भाषा, ललित कला इत्यादी विषयावर विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण पोस्टर सादर केले. स्पर्धेत एकूण १२० विद्यार्थी स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता, त्यांनी ७२ पोस्टर्सचे सादरीकरण केले. यामधून एकूण २३ विद्यार्थ्यांचे पोस्टर पुढील स्तरावरील झोनल स्पधेर्साठी निवडण्यात आले आहेत. स्पर्धेचे परीक्षण डॉ.एम.एस. गजभिये, डॉ.आर.डी. काळे, प्रा. कृष्णा कुलकर्णी यांनी केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अशोक काळंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले, 'आविष्कार स्पर्धा विद्यार्थ्यांच्या संशोधनाला प्रोत्साहन देते, त्यांच्यामध्ये नवीन ऊर्जा निर्माण करते. सुरूवातीला ही स्पर्धा महाविद्यालयात आयोजित केली जात होती, त्यानंतर ती विद्यापीठात आयोजित केली गेली. २००६ साली पुणे विद्यापीठाने या स्पर्धेत देशामध्ये प्रथम पारितोषिक मिळवले होते.'

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित केली होती. सी. आय.ए.आर. चे संचालक डॉ. सचिन कुलकर्णी, आय.क्यु.ए.सी. चे सह समन्वयक डॉ. अरुण मगर यावेळी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संख्याशास्त्र हे डेटा सायन्सचे आधारस्तंभ : डॉ. एस. आर. कुलकर्णी

सायली गणेशकर

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संख्याशास्त्र विभागामार्फत चालु शैक्षणिक वषार्पासून 'एम. एस्सी. इन डेटा सायन्स' हा अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे माजी प्राध्यापक डॉ. एस. आर. कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले . यावेळी 'डेटा सायन्स इज इट चिनी कम स्टॅटिस्टिकल सायन्स'? या विषयावर ते बोलत होते.



आजच्या युगातील डेटा सायन्समध्ये संख्याशास्त्राचा महत्वाचा वाटा आहे. संख्याशास्त्र हे डेटा सायन्सचा आधारस्तंभ आहे. त्याच्या मदतीने आधुनिक युगातील आधुनिक तंत्रज्ञान आपण सहजतेने आत्मसात करू शकतो असे वक्तव्य त्यांनी यावेळी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी विविध क्षेत्रामध्ये डेटा सायन्सची वाढती मागणी अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संख्याशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. विकास काकडे, सूत्रसंचालन डॉ. पूजा गायकवाड तर आभार प्रदर्शन डॉ. प्रीती मालुसरे यांनी केले.

# राष्ट्रीय कॉर्फबॉल स्पर्धेत महाराष्ट्र चौथ्या स्थानी

वैभव गायकवाड

**बारामती :** २१व्या राष्ट्रीय कॉर्फबॉल फेडरेशन स्पर्धेत महाराष्ट्राने चौथा क्रमांक पटकावला. कॉर्फबॉल फेडरेशन ऑफ इंडिया व कॉर्फबॉल असोसिएशन हरियाणा यांच्या संयुक्त विद्यमाने हरियाणातील रोहतक येथील महर्षी दयानंद विद्यापीठ येथे दोन दिवसीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील ७ खेळाडूंचा सहभाग होता.




राष्ट्रीय कॉर्फबॉल फेडरेशन स्पर्धेत हरियाणा प्रथम, हिमाचल प्रदेश द्वितीय, जम्मू काश्मीर तृतीय तर चौथ्या स्थानी महाराष्ट्र संघ राहिला. महाराष्ट्र संघाच्या १४ खेळाडूंचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीर तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती येथे प्रा. डॉ. गौतम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

महाराष्ट्र संघात नाशिक, अहिल्यानगर, संभाजीनगर, सातारा, सोलापूर, पुणे येथील खेळाडूंचा सहभाग होता. यामध्ये टी.सी. महाविद्यालयातील प्रणव पोमणे (कर्णधार), आकाश गायकवाड, अथर्व पायाळ, हर्ष मोहिते, किरण भोसले, श्वेता वाघ, गौरी शेंडे या ७ खेळाडूंचा सहभाग होता. महाराष्ट्र संघाच्या कॉर्फबॉल संघाचे प्रशिक्षक वरूण भोसले (माजी विद्यार्थी टी.सी कॉलेज), संघ व्यवस्थापक श्रीकांत सपकाळ (माजी विद्यार्थी टी.सी कॉलेज) होते. महाराष्ट्र संघ चौथ्या स्थानी राहिल्याने कर्णधार प्रणव पोमणे यांनी संघातील नवीन खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केल्याचे म्हटले, तर प्रा. डॉ. गौतम जाधव यांनी पुढील स्पर्धेमध्ये संघ यापेक्षाही उत्कृष्ट कामगिरी करेल असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

अक्षय एंटरप्रायजेस & पुस्तकालय
GOLDEN AMBOSING PROJECT (BLACK BOOK)
स्पायरल बायडिंग
COLOUR PRINT / LAMINATION
TYPING (ENGLISH / MARATHI)
डोमासाइल
उत्पनाचा दाखला
PAN CARD
जातीचा दाखला
जातपडताळणी दाखला
VOTING CARD
EWS दाखला
नॉन क्रिमिलेयर दाखला
झेरॉक्स
सर्व प्रकारचे ऑनलाईन फॉर्म भरून मिळतील.
MPSC, UPSC, BANKING, SSC, RRB, POLICE BHARTI, सरळ सेवा
सर्व प्रकारची स्टेशनरी
11 वी, 12 वी, BA, B.COM, BSC नोट्स, GDC & A पुस्तक, हॅन्डबूक MPSC, UPSC, BANKING, POLICE BHARTI, सरळ सेवा व इतर प्रकारची पुस्तके & नोट्स योग्य दरात (DISCOUNT) मिळतील.
अक्षय अभ्यासिका
MPSC, UPSC, CA, CET, JEE, NEET & SET, NET, GATE
सर्व विद्यार्थ्यांसाठी शांत अभ्यासमय वातावरण असणारी अभ्यासिका.
लेडिज साठी स्वतंत्र सोय
पत्ता : TC College समोर, प्रथमेश कॉम्प्लेक्स, बारामती Mo:9766668923/8668257073

गुरुकृपा कंन्स्ट्रक्शन अँड कॉन्ट्रॅक्टर
धुमस मशिन भाड्याने मिळेल
प्रो. प्रा. संतोष लोणकर, सौरभ लोणकर
९४२२१०८३१७ ९३७३२१९६६७



# टी. सी. महाविद्यालयामध्ये 'म्युझिकलिट'

मृण्मयी आसबे

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील इंग्रजी विभागांतर्गत इंग्रजी भाषा व साहित्य संघाच्या वतीने 'म्युझिकलिट' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे साहित्य आणि संगीताची जोड. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या जिवराज सभागृहामध्ये पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप उपस्थित होते.

या कार्यक्रमात इंग्रजी विभागातील प्रा. संदेश राठोड यांनी त्यांच्या बँडसह इलेक्ट्रिक गिटार वाजवत कविता गायन सादर केले. त्यांना आशिष गावडे यांनी ड्रम्स वाजवत साथ दिली. यावेळी अभिजीत पगारे यांनी एकोस्टिक गिटार वाजवत गीत सादर केले. जगदीश गायकवाड यांनी बेस गिटार वाजविले त्यांना संदेश वाडेकर यांनी की - बोर्डवर साथ दिली. या कार्यक्रमाचे आयोजन इंग्रजी विभागातील प्रा. संदेश राठोड यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यलयाचे उपप्राचार्य डॉ. काळंगे, उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्मिता गोरे यांनी केले.

# टी.सी. मधील पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांची केंद्रीय संचार ब्युरो मार्फत आयोजित मल्टिमीडिया प्रदर्शनाला भेट

प्रविण राहिंज



**बारामती :** केंद्रीय संचार ब्युरो मार्फत मल्टिमीडिया प्रदर्शन २०२३ चे आयोजन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय बारामती आणि बारामती बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २२ ते २३ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. देशभरात गेल्या १ जुलै पासून ३ नवीन फौजदारी कायदे आमलात आले आहेत. याविषयी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी हे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

या प्रदर्शनाला टी.सी महाविद्यालयातील पत्रकारिता आणि जन संज्ञापन विभागाने भेट दिली. यावेळी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना क्षेत्रीय प्रचार अधिकारी हर्षल अकुडे म्हणाले की, कायदा व सुव्यवस्था असेल तर शांतता राखली जाऊ शकते. त्यामुळे नेमका कायदा काय? हे सामान्य नागरिकांना माहिती असणे गरजेचे आहे. १ जुलै पासून भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, भारतीय पुरावा कायदा हे रद्द होऊन भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३, भारतीय साक्ष अधिनियम हे नवीन कायदे लागू करण्यात आले आहेत.

यावेळी ॲड. अजित कोकरे म्हणाले की, कोणताही गुन्हा हा थेट होत नसतो, त्या अगोदर काहीतरी संकेत मिळत असतात. त्यामुळे नागरिकांनी हे संकेत लक्षात घेऊन त्याची तक्रार नोंदवावी. नव्याने लागू झालेल्या ३ फौजदारी कायद्यांविषयी तसेच अजूनही विविध कायदे आणि तरतुदींविषयी देखील विद्यार्थांनी माहिती जाणून घेतली. यावेळी सहाय्यक प्रचार अधिकारी फणिकुमार पेम्मरजू, प्रा. पुजा पवार, सर्व विद्यार्थी उपस्थित होते.




# तलवारबाजी स्पर्धेत टी.सी. महाविद्यालयास सांघिक विजेतेपद

वैभव गायकवाड

**बारामती :** हुतात्मा शिवराम हरी राजगुरू क्रीडा संकुल, राजगुरूनगर (खेड) येथे जिल्हा क्रीडा परिषद पुणे आयोजित शासकीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ मधील जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत टी.सी. महाविद्यालयातील १४ खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. ईपी, फाईल, सेबर या क्रीडा प्रकारात खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. तलवारबाजीमध्ये महाविद्यालयाच्या खेळाडूंनी सांघिक विजेतेपद मिळविले.

फाईल प्रकारात ६ खेळाडूंनी विजेतेपद मिळवून सांघित विजेतेपद पटकावले. यामध्ये अनिशा देवकर प्रथम, धनश्री शिंदे द्वितीय, संस्कृती गटकिळे, हर्षदा माने तृतीय, तर करण सुरवसे द्वितीय आणि शुभम सुर्यवंशीने तृतीय क्रमांक मिळवला. सेबर प्रकारात ४ खेळाडूंनी यश संपादन केले. यामध्ये अनिशा देवकर द्वितीय, संस्कृती गटकिळे, आर्या पोळ, प्रविण नरवडेने तृतीय क्रमांक मिळवला. ईपी क्रीडा प्रकारात ४ खेळाडूंनी विजेतेपद मिळवले. यामध्ये आर्या पोळ द्वितीय, विद्या मोरे, रसिका भोसले, करण सुरवसेने तृतीय क्रमांक मिळवला.

ईपी, फाईल, सेबर या तिन्ही प्रकारात खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करून जिल्हास्तरीय क्रीडा प्रकारात महाविद्यालयास सांघिक विजेतेपद मिळवून दिले. या खेळाडूंची पुणे विभागस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.या खेळाडूंना डॉ. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहरशाह वाघोलीकर, संस्थेचे सचिव मिलिंदशाह वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी अभिनंदन केले.

# 'टी.सी'च्या खेळाडूंचे विविध स्पर्धेत घवघवीत यश

वैभव गायकवाड

**बारामती :** येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी इंग्लिश मीडियम स्कूल, येथे जिल्हा क्रीडा परिषद पुणे यांच्या वतीने आयोजित शासकीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ मधील तालुकास्तरीय बुद्धीबळ स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत टी. सी. महाविद्यालयातील खेळाडूंनी यशस्वीपणे कामगिरी केली. या स्पर्धेत मुलींमध्ये समिक्षा मंडले हिने द्वितीय क्रमांक मिळवला, तर मुलांमध्ये राज दुधाळ याने द्वितीय क्रमांक पटकावला. यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे दोन्ही खेळाडूंची पुणे येथील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

बारामती तालुका कुस्तीगीर संघाच्या तालमीत झालेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत फ्रीस्टाईल प्रकारातदेखील महाविद्यालयातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. फ्रीस्टाईल कुस्ती प्रकारात प्रेम गायकवाड (४८ कि.ग्रॅ), अक्षय गायकवाड (६१ कि.ग्रॅ), शिवराज गुळूमकर (९७ कि.ग्रॅ) या खेळाडूंनी प्रथम क्रमांक मिळवला, तर अथर्वराज बाबर (४५ कि.ग्रॅ), आव्हान महात (७९ कि.ग्रॅ), साईराज माने (७० कि.ग्रॅ) यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. फ्रीस्टाईल प्रकारात प्रथम आलेल्या खेळाडूंची पुणे जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तालुका क्रीडा संकुल, माळेगाव येथे तालुकास्तरीय तायक्वांदो स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत रोहन बनकर (७८ कि.ग्रॅ), जान्हवी ढवाण (४२ कि.ग्रॅ), कृतिका घाटे (५२ कि.ग्रॅ) यांनी प्रथम, तर श्रावणी मानेनं (५२ कि.ग्रॅ) द्वितीय क्रमांक पटकावला. या खेळाडूंना डॉ. गौतम जाधव व प्रा. अशोक देवकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## संपादकीय मंडळ २०२४- २५

संपादक : अंशुमन बोभाटे
उप संपादक : वैभव गायकवाड
वृत्त संपादक : वैभव गायकवाड ,राम पडळकर, सायली गनेशकर, वैष्णवी थोरात
वार्ताहर : सौरभ तावरे, ऋतुजा कोकरे,प्रवीण रहींज, मृण्मयी आसबे, अश्विनी टेंबरे, आकांक्षा देवकाते, आदित्य गायकवाड
छायाचित्रण : स्वराज कांबळे
ग्राफिक्स : रितेश लोंढे
जाहिरात विभाग : आदित्य गायकवाड,मृण्मयी आसबे, अंशुमन बोभाटे
शब्दकोडे : प्रवीण रहींज
प्रश्नमंजुषा : अंशुमन बोभाटे
वितरण विभाग : अजय रणदिवे, उमेश शिंदे, साहिल खुडे,चैतन्य कांबळे
मार्गदर्शक : प्रा. पुजा पवार

## प्रश्नमंजुषा

१) **एक देश एक निवडणूक समिती चे अध्यक्ष कोण आहेत?**
अ. नरेंद्र मोदी ब .राहुल गांधी
क. रामनाथ कोविंद ड. अमित शहा

२) **महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष कोण आहेत ?**
अ. सचिन तेंडुलकर ब. अजित पवार
क. देवेंद्र फडणवीस ड. संजय बनसोडे

३) **.... हे भारताचे पहिले पॅरालिम्पिक पदक विजेते आहेत.**
अ. मुरलिकांत पेटकर ब. खाशाबा जाधव
क. मिल्खा सिंग
ड. मनु भाकर

४) **इस्त्रो चे मुख्यालय कोठे आहे?**
अ. नवी दिल्ली
ब. मुंबई क. बेंगळुरू
ड. श्रीहरीकोटा

५) **राष्ट्रपतीपदक प्राप्त पहिला मराठी चित्रपट कोणता?**
अ. सैराट ब. श्यामची आई क. जोगवा ड. देऊळ

उत्तरे : १. क : रामनाथ कोविंद २. ब : अजित पवार ३. अ : मुरलीकांत पेटकर ४. ड : श्रीहरीकोटा ५. ब : श्यामची आई







